# आर्थिक व्यवहाराच्या नवीन पर्वाला सुरुवात - जिल्हाधिकारी सचिन्द्र प्रताप सिंह
# नागरिकांनी कॅशलेस व्यवहाराकडे वळण्याचे आवाहन

दि. १४: आर्थिक व्यवहाराच्या नवीन पर्वाला सुरुवात झाली असून आर्थिक व्यवहारात बळकटी व सुलभता निर्माण करण्यात येत आहे. रोखरहित प्रणालीचा अंगीकार करणे ही काळाची गरज असून या प्रणालीत सहभागी न होणारे घटक भविष्यात आर्थिक व्यवहार प्रणालीतून बाहेर फेकले जातील. त्यामुळे जिल्ह्यातील सर्वच नागरिकांनी रोखरहित व्यवहाराकडे वळावे, समाजातील सर्व घटकांनी याचा लाभ घेऊन रोखरहित व्यवहाराला प्राधान्य द्यावे. असे आवाहन जिल्हाधिकारी सचिन्द्र प्रताप सिंह यांनी समस्त जिल्हावासीयांना केले आहे.

विकसनशील देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोखरहित अर्थव्यवस्था अस्तित्वात आहे. रोखरहित व्यवहाराला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र शासनाकडून सवलती सुध्दा जाहीर केल्या आहेत. केंद्र शासनाच्या या निर्णयाच्या आधारावर रोखरहित व्यवहाराची हाताळणी व्हावी, रोखरहित व्यवहारांना प्रोत्साहन मिळावे म्हणून जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांना, सहकारी संस्था, बाजार समित्या, उद्योजक, व्यपारी, अधिकारी कर्मचारी यांना हे प्रशिक्षण दिले जात आहे. यातून रोखरहित चलन व्यवहाराचे महत्त्व सांगण्यात येत आहे.

बँकांच्या ऑनलाईन सोयीसुविधा विविध ॲप यांच्या माहितीचे सादरीकरण करून रोखरहित व्यवहार कशा पध्दतीने करावा याचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात येत आहे. रोखरहित व्यवहारासाठी मोबाईल ॲप, प्रिपेड कार्ड, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, इंटरनेट बँकिंग यासारख्या सुविधांबरोबर युनिफाईड पेमेंट इंटरफेस (यूपीआय),अविस्तृत पूरक सेवा माहिती (यु.एस.एस.डी), आधार सक्षम पेमेंट सिस्टीम (AEPS), प्रीपेड वॉलेट, कार्डस, पीओएस इ. प्रणालीद्वारे कोणत्याही मोबाईल फोनच्या इंटरफेसमधून इंटरनेटशिवाय पैसे पाठविणे शक्य आहे. या सर्व सुविधांच्या महत्त्वाबाबत लहान व्यापारी व सामान्य नागरिकांमध्ये जागृती करण्यात येत आहे. त्यासाठी जिल्ह्यात वित्तीय संस्था व बँकांच्या माध्यमातून बाजार समित्या, आठवडी बाजार, मोठी आस्थापना, कार्यालय, बँका, मोठया प्रमाणात व्यवहार होणारे प्रतिष्ठाने आदींना प्रशिक्षण देण्यात येत आहे. शासकीय कर्मचाऱ्यांनी रोखरहित व्यवहार प्रणाली ग्रामीण पातळीपर्यंत कशा पध्दतीने न्यावी यासाठी कार्यशाळांचे आयोजन जिल्ह्यातील तहसीलस्तरावर करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

केंद्र शासनाने जाहीर केलेली नोटबंदी व त्यावरील उपाययोजना म्हणून कॅशलेस व्यवहाराकडे होत असलेली वाटचाल याबाबत तर्कवितर्क न करता ही एक नवीन संधी असून या रोकडरहित अर्थ रचनेच्या नवीन संधीचा सर्वांनी स्वीकार करावा. भ्रष्टाचार मुक्त समाजाच्या निर्मितीसाठी केंद्र शासनाने नोटाबंदी व कॅशलेस व्यवहाराच्या माध्यमातून उचललेले पाऊल पाहता ग्राहकांच्या हितासाठी व सुलभ बँकींग व्यवहारांसाठी स्वाईप मशीनचा पर्याय उपलब्ध करून देण्यात येत आहे. जिल्हयात लवकरच अशा मशिन उपलब्ध होणार असून यातून नागरिकांना रोखरहित व्यवहार करणे सुलभ जाणार आहे. एटीएम कार्डबाबत माहिती एटीएम कार्डची काळजी कशी घ्यायची, एटीएम कार्ड वापरण्याची पध्दत, एटीएम कार्डचे फायदे इत्यादींबाबतची माहिती युवकांना चांगल्या प्रकारे माहित असते. त्यामुळे अभियांत्रिकी, वैद्यकीय, वाणिज्य यासह उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी रोखरहित व्यवहार करावा आणि कुटुंबातील सदस्यांना या व्यवहारां माहिती द्यावी. जणेकरून रोखरहित व्यवहाराची भिती निघून जाईल तसेच रोखरहित पध्दतीबाबत जनजागृती होईल. जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, तसेच खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी सुध्दा कॅशलेस व्यवहार करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी सचिन्द्र प्रताप सिंह यांनी केले आहे.

============